**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१६**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-४/२/२०१३

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र.१६ शुक्रवार दि.०८/२/२०१३ रोजी सकाळी ११.३० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**शुक्रवार दिनांक- ०८/२/२०१३ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ८४ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ सालचे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे मा.आयुक्त सादर करणार असलेले मुळ अंदाजपत्रक (म.न.पा.स्कुल बोर्डासह ) विचारार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १६**

विषय क्रमांक-८४ शुक्रवार दिनांक ०८/२/२०१३

ठराव क्रमांक-८४ शुक्रवार दिनांक ०८/२/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ सालचे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे मा.आयुक्त सादर करणार असलेले मुळ अंदाजपत्रक (म.न.पा.स्कुल बोर्डासह ) विचारार्थ.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर
जा.क्र.अर्थ / अंदाजपत्रक /६५१/१३ दिनांक ०२/०२/२०१३

**विषय :-** सन २०१२-२०१३ चे सुधारित व सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणेबाबत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१२-२०१३ चे सुधारित व सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रक सादर करावयाचे असल्याने दिनांक ०८/०२/२०१३ रोजी सकाळी ११.३० वाजता या प्रयोजनासाठी मा.स्थायी समिती सभा बोलविण्यात यावी, ही विनंती.

येणेप्रमाणे मा.आयुक्त श्री. विजय कुलकर्णी सो. यांचे पत्र

--**--

मा.स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०८/०२/२०१३ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.स्थायी समिती सभागृह महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत ,औरंगाबाद रोड येथे भरली असता मा.सभापती साहेब यांनी मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी सो. यांचे सभेमध्ये पुष्प गुच्छ देवुन स्वागत केले व अंदाजपत्रकीय सभेस सुरूवात करणेस सुचित केले.

**मा.आयुक्त श्री. विजय कुलकर्णी :-** मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, कर्मचारी व उपस्थित पत्रकार बंधु यांचे सभेमध्ये स्वागत करतो. मी आज सन २०१२-२०१३ सालचे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) मा. स्थायी समिती कडेस मंजूरी करिता सादर करीत आहे. त्यास मा.स्थायी समितीने व महासभेने मंजूरी द्यावी. सदर अंदाजपत्रक मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणेकामी सभेचे आयोजन करणे विषयी मी दिनांक ०२/२/२०१३ रोजी मा.सभापती, स्थायी समिती यांना पत्र दिले होते. सभापती स्थायी समिती , उपस्थित सर्व स्थायी समिती सदस्य यांचे स्वागत करतो. मी आज सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प मा.सभापती स्थायी समिती यांच्याकडे सादर करीत आहे.

**मा.सभापती साहेब :-** अहमदनगर शहराच्या सर्वांगिण विकासाकरीता आवश्यक असणारे महानगरपालिकेचा अर्थसंकल्पा करीता आजची मिटींग आयोजित करण्यात आलेली आहे. सर्वात प्रथम मी मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे समितीच्या वतीने हार्दिक स्वागत करतो.

यानंतर मा.आयुक्त साहेब यांनी अर्थसंकल्पावरील आपले मनोगत व्यक्त केले तद्नंतर मा.सभापती साहेब यांनी मा.स्थायी समितीकडेस सादर झालेल्या अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे करिता मा.स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ११/०२/२०१३ रोजी सकाळी ११.३० वाजता सुरू होईल असे घोषित केले.

मा.स्थायी समितीची शुक्रवार दिनांक ८/०२/२०१३ रोजी अंदाजपत्रकाची सभा अभ्यासाकरीता आज तहकुब करण्यांत येत आहे व दिनांक ९/०२/२०१३ व दि.१०/०२/२०१३ रोजी सुट्टी असल्याने अंदाजपत्रकीय सभा पुढे सोमवार दिनांक ११/०२/२०१३ व मंगळवार दिनांक १२/०२/२०१३ रोजी चालू असलेल्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

--**--

## चर्चा :-

**मा.सभापती साहेब :-** सभेचे कामकाज सुरु करण्यांत यावे.

**आज दिनांक ११/०२/२०१३ रोजी सकाळी ११.३० वाजता स्थायी समितीची सभा अंदाजपत्रकाच्या विचारार्थ सुरु झाली.**

**मा.श्री.शेख अरीफ शे.र. :-** दिनांक ०८/०२/२०१३ रोजी अनुपस्थित असलेल्या स्थायी समिती सदस्यांना अंदाजपत्रकाच्या प्रती घरपोच मिळाल्या नाहीत. त्यामुळे अभ्यास करता आला नाही. या प्रती का मिळाल्या नाहीत याचा खुलासा कोण करील.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** प्र.नगरसचिव खुलासा करा.

**प्र.नगरसचिव :-** अर्थ विभाग अंदाजपत्रक सादर करते,अंदाजपत्रकाच्या प्रती देण्याचे काम अर्थ विभागा मार्फत केले जाते. तथापि सदस्यांच्या झालेल्या गैरसोयी बद्दल प्रशासनाकडून दिलगीरी व्यक्त करीत आहोत.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** मागील बजेट खर्च पडले नाही. त्याचे निर्णय काय तुम्ही पुढील बजेट आणले.आजची बिले थकीत मध्ये दाखवणार की कसे याचा निर्णय दया. सन २०१२-२०१३ चा प्रस्ताव मंजूरीला आहे. आधी त्याचा निर्णय दया. मग सन २०१३-२०१४ चा विचार करू. निधी थकीत मध्ये घालणार ना ? कामच करेना कोणी आधी त्याचा निर्णय सांगा. मग आपण त्याच्यावर चर्चा करू थकीत बिलाचा काय निर्णय करणार ते सांगा दि. १० फेब्रुवारी आहे. फेडरेशनकडे गेल्यानंतर यायला १०-१५ दिवस लागतात. या कामाला उशीर होणार . मा.आयुक्त , मा.उपायुक्त व अकौंट विभाग कारणीभूत आहे . मा.आयुक्त साहेबांना इथ बोलवा. या कामाचा निर्णया घ्या डॉ. डोईफोडे साहेब तुम्ही निर्णय घेणार नाही. तुम्ही सांगीतल होत सप्टेंबर नंतर खतवायला घेणार आधी सन २०१२-२०१३ चा निर्णय घ्या.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** श्री. मगर साहेब तुम्हाला लेखी आदेश होते का ? ते सांगा.

**शहर अभियंता श्री. मगर :-** डिसेंबरच्या दरम्यान काही हेडवाईज आदेश प्राप्त झाले. काही मा.नगरसेवकांनी दिलेल्या यादीनुसार कार्यवाही सुरू आहे.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** खर्च खतवू नये या करीता कारणे दिली होती का ?

**शहर अभियंता श्री. मगर :-** आर्थिक परिस्थिती हे कारण होते.

**मा.श्री.डागवाले कि.आ.:-** ही परिस्थीती लगेच निदर्शनास का आणली नाही.ठेकेदाराला पैसे न मिळण्याची भिती आहे.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** मागचेच थकीत खूप आहेत.सन २०१२-२०१३च्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद का केली नाही.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** ठेकेदार काम घेणार नाही. ते थकीत मध्ये पडते. थकीतमध्ये जायच कारण काय सन २०१२-२०१३च्या बजेट पेक्षा जास्त काम झालेल नाही.

**मुख्य लेखाधिकारी श्री. शेलार :-** जकात बंद झाली एल.बी.टी. सुरू झाल्याने उत्पन्न कमी झाले.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :-** किती कामे बजेट नुसार पुर्ण आहेत.

**शहर अभियंता श्री. मगर :-** ९० टक्के पर्यत खर्ची पडले. थकीत साठी २० कोटीची तरतूद केली आहे. वर्क ऑर्डर देवुन सोडुन चालणार नाही. थकीतची तरतूद करावी लागेल.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** नगरसेवक निधीचे काम बाकी आहे.

**शहर अभियंता श्री. मगर :-** प्रशासकीय मंजूरी १० टक्के पर्यत पेंडीग आहे. आमच्याकडे जेवढे काम आले ते मंजूर झालेल्या कामाचे पत्र गेले.

**मा.श्री.डागवाले कि.आ. :-** काम व्हायला किती वेळ लागेल.

**शहर अभियंता श्री. मगर :-** मुदत ३ महिने असते.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** मुदत वाढवून दया. तुमच्या मुदतीत कामे होतील त्यांची बिले थकीत मध्ये जाणार नाहीत.

**मा.श्री. डागवाले कि.आ.:-** आमची कामे झाली नाहीत.२ महिने मुदत वाढवून दया. बजेट रजिष्टरची मुदत मे पर्यत ठेवा.सन२०१२-२०१३ मध्येच खतवणार का ? वर्क ऑर्डर वर मुदत किती ठेवता.

**शहर अभियंता श्री. मगर :-** मार्च पर्यत मुदत आहे. त्यांना अडचण नाही. मुदतीत काम न झाल्यास कामाची मुदत मे व जून पर्यत होईल त्या कामांची देयके लेखाशिर्ष सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील लेखाशिर्षामधुन खर्च भागवावा लागेल. या कार्यवाहीमुळे प्रस्ताव थकीत देयकात समाविष्ट होणार नाहीत.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** लेखाशिर्षाची मुदत वाढवली तर ती किती.

**शहर अभियंता श्री. मगर :-** जेवढे काम आहे त्याची बेरीज करून त्या आकडयाची तरतूद वाढवावयाची आहे. ज्यांना वर्क ऑर्डर देण्यांत आली आहे त्याची पुर्तता करण्यांत येईल.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** सन २०१२-२०१३ मध्ये वर्क ऑर्डर दिलेल्या कामाची मुदत सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षामधे येत असेल तर सदर कामे खतविणे, देयक अदा करणे यासाठी सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचा उपयोग प्रशासन करेल. मग नगरसेवकांनी नव्याने कामे सुचवायची कशी ?

**शहर अभियंता श्री. मगर :-** तरतूद वाढवली तर ही कामे पुढील वर्षात टाकता येतील.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** या कामांची यादी देण्यांत यावी.

**मा.श्री.डागवाले कि.आ.:-**जिल्हापरिषदेला दोन महिन्याची मुदत दिली जाते. ती आपण का देउ शकत नाही.

**मुख्य लेखाधिकारी श्री.शेलार:-**दोन गोष्टी एका वेळेस करू शकत नाही. या वर्षी तरतूद २२ कोटी आहे.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** तरतूद ठेवावी लागते ना.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** काही कामाचे एस्टीमेंटच नाही. त्याची पत्र कधी हातात पडणार आहे.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे:-** जमाबाजू पहा खर्च बाजू आपण पहाणार आहोत लेखार्शिष वाईज पहा.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** साहेब कर्मचा-यांचे ३ महिने पगार होत नाही . मग कामाचे काय.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** जमेच्या बाजूवर चर्चा करा. बाकीच नंतर पाहू तुम्ही तुमच फेडरेशनला पाठवा एजन्सी दया. काम पार पडायलाच पाहिजे.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** नागरिकांच्या अपेक्षा वाढतात. काम होत नाही प्रशासनाने ऑगस्ट, सप्टेंबर , नोव्हेंबर , डिसेंबर मध्ये काम का नाही खतवले त्यांनी डिसेंबर मध्येच काम खतवायला सुरूवात केली. ही बाब कायद्याला धरुन आहे का ?

**मा.सभापती साहेब :-** जमा बाजू पहा.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** मा.आयुक्त साहेबांना बोलवा चर्चा करू नंतर ठरवू.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** मा.आयुक्त साहेब रजेवर आहेत. जमा बाजू पहा.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** पहिले सन २०१२-२०१३ चा निर्णय दया नंतर चर्चा करू मा. आयुक्त आल्यानंतर बोलू.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे** :- जमा बाजूचा विचार करू एवढे ऐका

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** डॉ. डोईफोडे साहेब तुम्ही आम्हाला याबाबत काही सांगू नका.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** तूम्ही आयुक्तांना फोन लावा काय म्हणतात बघा अर्धा तास आम्ही थांबतो तोपर्यत तुम्ही बोला.

**मुख्य लेखाधिकारी श्री. शेलार :-** जमा बाजूचा विचार केल्यानंतर खर्च किती करायचा ते कळेल.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** मा. नगरसेवकांनी सांगितल्या प्रमाणे आयुक्तांशी चर्चा झाली. जे जमा होणार होते त्या अनुशंगाने काही खर्चात कपात करणे आवश्यक आहे. खर्चाचे काही बदल करण्यांत आले आहे. जुलै पासून एल.बी.टी. चालू झालेली आहे. आपण कर्मचा-यांची पेमेंट व ठेकेदाराची बिल देवु शकत नाही. सध्या फक्त चालू महसूली खर्च करण्यात येत आहे. आपल्याकडे जमा कमी असल्याने ठेकेदार काम करू शकत नाही. वर्क ऑर्डर झाल्यानंतर मुदतीत किंवा मुदतीनंतर काम झाल्यानंतर त्यांना आपण पैसे देतो. यावर्षीच्या बजेटमध्ये मा.आयुक्तांशी चर्चा करू, थकीत देयकाबाबत कागदोपत्री निधी तयार करू शकत नाही. मा. महासभेने आम्ही प्रपोज केलेली तरतूद २१ कोटी कमी करून १७ कोटी केलेली आहे. थकीत देयक हे हेड कुठल्याही एका विभागासाठी वापरता येणार नाही. आपल्या परिस्थिती मुळे जे बिल आपण देउ शकत नाही त्यांची यादी करायची आहे. १ एप्रिलला आपल्याला पुढच्या वर्षी किती देणे आहे ते समजेल त्यासाठी हे ठरवायच या बजेटमध्ये आम्ही १ एप्रिलमध्ये जे थकीत बिल आहे त्यासाठी जे लेखाशीर्ष आपल्या बजेटमध्ये आहे व सन २०१३-२०१४ च्या लेखार्शिषामध्ये सन २०१२-२०१३ चे काम जे ठेकेदाराच्या हातात असतील व वर्क ऑर्डर असेल याच्यामध्ये अपेक्षीत असे आहे. ज्या ज्या वर्षीचे बजेट हे त्या त्या वर्षीच खर्च करायला पाहिजे. बजेट आधार समजून चालावे लागेल,म्हणून थकीत ची तरतूद फक्त एकाच विभागासाठी नसेल तर ती एकत्रीत असेल.

**मा.श्री.सातपुते :-** हे लेखाशिर्ष पुर्वी नव्हते का ? ते कधी सुरु झाले.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** १ एप्रीलला किती देणे आहे हे माहिती नव्हते.ते ठरवून ते देण्याकरीता हे लेखाशिर्ष केले आहे. ३१ मार्च पर्यंतची बिले आहेत.ती थकीत असतील.२०१२-१३ चे काम पुढील काळात चालणारे काम असेल व मुदत बाकी असेल तर ते २०१३-१४ मध्ये खतवले जाईल.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-म**ागील बजेटची शिल्लक आपण पुढे दाखवली नाही.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** जी तरतूद आहे ती त्याच वर्षात खर्च व्हावी. परंतू आपण तेवढी रक्कम देउ शकत नाही.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** प्रस्तावीत झालेल्या कामांचे बजेट किती ? सन २०१२-१३ च्या रकमा २०१३-१४ मध्ये खतवण्यास आमचा विरोध आहे. मा.महासभेने अंदाजपत्रक मंजूर केल्यानंतर सुमारे सहा महिने लेखाशिर्ष वापरले गेलेले नाही. त्यामुळे हा उशीर प्रशासनाने केला आहे.

**मा.सौ.खरमाळे सं.र:-**बजेट पुर्ण वर्षाचे असते.मग तुम्ही ३०टक्के आधी व ७०टक्के नंतर असे का केले.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** जमा रकमेचा अंदाज तुम्ही घेतलाच पाहिजे. मागील बजेट ॲक्चूअल बजेट आहे. उत्पन्न वाढवून दाखवल्यामुळे खर्चाला रक्कम पुरत नाही.

**मा.श्री. डागवाले कि. आ. :-** मा. महासभेने बजेटला मान्यता दिल्यानंतर तुम्ही आम्हाला का सांगता.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** तुम्ही जमा दाखविलेली रक्कम पुर्ण जमा होत नाही.

**मा.श्री. डागवाले कि. आ. :-** का जमा होत नाही. याला प्रशासन जबाबदार आहे. आम्ही बजेटच्या बाहेर कामे केली का. वसुली आपण करत नाही.

**मा.श्री. सातपुते दि.ना.:-** ठेकेदार म्हणतो बिल निघत नाही. तर तुम्ही काम करायला का सांगता.

**मा.श्री. डागवाले कि.आ.:-** तुम्ही आता आधी सन २०१२-२०१३ चा निर्णयाच्या नंतर आपण सन २०१३-२०१४वर बोलू जकात बंद झाल्या झाली. मा. महासभेत बजेटचा विषय घ्यायला पाहिजे होता. लेट झालेली कामे कशात खतवणार. हे नियोजन सप्टेंबर मध्येच व्हायला पाहीजे होते.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** ८ महिन्याची फिगर पाहिजे जी जमा आहे ते कॅफो तुम्हाला सांगतील. आपल्या बजेटचा नमुनाच असा आहे. सगळे डिपार्टमेंट अनुदानावर चालतात जर त्या कामाची तरतूद असेल तर ते काम आपण करू शकतो.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** २०१२-१३ ची बिले २०१३-१४ मध्ये खतवू नये. ते बजेट रजिस्टर २ महिने पुढे चालू ठेवावे.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** जर कामाची तरतूद पुढील वर्षी ही असेल तर ती पुढील वर्षी बिले दिली जातात.कारण तो निधी पुढील वर्षी ही असतो. शहर अभियंता श्री. मगर महिती द्या.

**शहर अभियंता श्री. मगर :-** एखादया मोठया स्वरूपाच काम असेल म्हणजे २ कोटी जर या चालू वर्षात २५ लाखाच काम झाल तर बाकीचे पैसे आपण दुस-या वर्षात बजेटमध्ये टाकतो. नगरोत्थान योजने अंतर्गत ५ कोटीच काम आपण करू शकतो.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** कामाचे नियोजन असल्याने पुढे लेखाशिर्ष तयार केले जाते.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** जर सन २०१२-२०१३ चे थकीत कामाचे पैस सन २०१३-२०१४ मध्ये खर्च दाखवला तर चालू वर्षामध्ये काम करणे अशक्य होईल. प्रलंबीत कामाचे आकडे द्या. नंतर पुढील बजेट विचारात घेउ.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** तुम्ही जमा बाजू ऐकून घ्या की पुढच्या वर्षासाठी आपल्याकडे किती पैसे येउ शकतील. तुम्ही आज जमा बाजू ऐकून घ्या. आपण उदया खर्चावर चर्चा करू खर्च बाजू आपण नंतर पाहू जमा बाजू पाहून घ्यायला काही हरकत नाही.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** देणे व कामे होणे किती शिल्लक आहे. याबाबत आकडेवारी द्यावी मग चर्चा करणे योग्य होईल.

**मा.सभापती साहेब :-** श्री. मगर साहेब तुम्ही आकडे देणार होतात ना.

**शहर अभियंता श्री. मगर :-** मार्च , एप्रिल पर्यत किती आकडा होईल ते देतो.

**मा.सभापती साहेब :-** आजची सभा उद्या सकाळी ११.०० वा. सुरू होईल.

**दिनांक १२/०२/२०१३ रोजी सकाळी ११.००वा. मा.स्थायी समिती सभागृह येथे बजेट बाबतच्या सभेस पुन्हा सुरूवात झाली.**

**मा.सभापती साहेबः-**आपण कालची बैठकीमध्ये काय सूचना दिल्या होत्या.त्यानुसार माहिती आणली का.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** अधिका-यांना वेळेचे महत्व नाही. तहकूब करा.

**मा.सभापती साहेब :-** २ मिनीटे वाट पाहू. नाहीतर तहकूब करू.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** अधिकारी बोलावतो.

**मा.श्री. कवडे उ.खं. :-** अधिका-यांना जबाबदारी नाही का

**मा.श्री. कोतकर सु.स. :-** सकाळी ११.०० ची वेळ दिल्यानंतर जे अधिकारी गैरहजर होते त्यांच्यावर कारवाई करा.

**मा.श्री. कवडे उ.खं. :-** कोण गैर हजर होते ते आधी सांगा.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** बैठकीस जे अधिकारी गैरहजर होते त्यांनी आपण होउन उभे रहा. श्री. मगर -शहर अभियंता, श्री. सोनवणे-आस्थापना प्रमुख , श्री.दहे.नगररचनाकार, श्री. इथापे-अतिक्रमण प्रमुख, डॉ.श्री. राजूरकर- प्र.आरोग्य अधिकारी, श्री. दिवाण- मार्केट प्रमुख , श्री. तडवी- प्रभाग अधिकारी क्र.१, श्री. गोयल- उदयान प्रमुख , ऑडीट विभागाचे श्री.बाबर, श्री. साळी- संगणक प्रमुख मी स्वत: विनंती करतो की सगळयांना समज देतो. शिक्षण मंडळाचे सदस्य नाही इलेक्ट्रीकचे पण कोणी नाही.

**मा.सभापती साहेब :-** इलेक्ट्रीकच्या शित्रे यांना काहीच कळत नाही.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** श्री. सावळे रजेवर आहेत. श्री. मगर तुम्ही आकडे सांगा म्हणजे चर्चा चालू होईल.

**शहर अभियंता श्री. मगर :-** बांधकाम विभागाच्या लेखाशिर्षाप्रमाणे तरतूद किती रस्ते दुरूस्ती रू.५० लाख मार्च २०१३ पर्यत तक्ता खालीलप्रमाणे

| अ.नं. | लेखाशिर्ष | तरतूद (आकडे लाखात) | माहे मार्च १३ पर्यत होणारा संभाव्य खर्च | माहे मार्च १३ नंतर होणारा संभाव्य खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रस्ते दुरूस्ती (पॅचिंग) | ५०.०० | ५००००० | -- |
| २ | रस्ते कॉक्रीटीकरण | ३५.०० | ३५००००० | -- |
| ३ | इमारत दुरूस्ती | १०.०० | १०००००० | -- |
| ४ | विकासभार | ५०.०० | ५०००००० | -- |
| ५ | पुल बांधणे | ६.०० | ६००००० | -- |
| ६ | नवीन गटर | ३०.०० | २६४६४१८ | ३५३५८२ |
| ७ | गटर दुरूस्ती | २४.०० | २४००००० | -- |
| ८ | नवीन इमारत | १८.०० | १२७७६७० | ५२२३३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | नवीन ड्रेनेज | ३०.०० | ३०००००० | -- |
| १० | ड्रेनेज दुरूस्ती | १८.०० | १८००००० | -- |
| ११ | रस्ते मजबूतीकरण | ३०.०० | ३०००००० | -- |
| १२ | उदयान विकास व तार कंपौड | १८.०० | १८००००० | -- |
| १३ | चौक सुधारणा व रूंदीकरण | ३.०० | ३००००० | -- |
| १४ | स्मशानभूमी व स्मशानभूमी सुधारणा | २०.०० | २०००००० | -- |
| १५ | रस्ते खडीकरण करणे | १५.०० | १५००००० | -- |
| १६ | रस्ते डांबरीकरण व नुतनीकरण | ३०.०० | ५९७५८७ | २४०२४१३ |
| १७ | सभागृह नूतनीकरण | ६.०० | ६००००० | -- |
| १८ | पुल बांधणे | ६.०० | ६००००० | -- |
| १९ | जे.सी.बी. भाडयाने लावणे | ३.०० | ३००००० | -- |
| २० | मागासवर्गीय कल्याण निधी | ३८६.०० | २७०९७१३० | ११५०२८७० |
| २१ | नवीन मुतारी | ३.०० | ३००००० | -- |
| २२ | अधिकारी निवासस्थान बांधणे | १५.०० | १५००००० | -- |
| २३ | नवीन प्रशासकी इमारत | १.०० | १००००० | -- |
| २४ | रेखांकन अंतर्गत सुधारणा | २००.०० | २००००००० | -- |
| २५ | उपनगरातील रस्ते विकसित करणे | १२०.०० | ४४३१२८८ | ७५६८७१२ |
| २६ | शहर उपनगर, हद्दवाढीतील परिसर विकसित करणे | ४४०.०० | २७१४३०४४ | १६८५६९५६ |
| २७ | आपत्कालिन व्यवस्थापन | १०.०० | १०००००० | -- |
| २८ | मा.सदस्य प्रभाग विकास निधी | ३६५.०० | ३५४१८३१६ | १०८१६८४ |
| २९ | वॉर्ड विकास निधी | २१०.०० | २१०००००० | -- |
| ३० | मा.महापौर शहर विकास निधी | २००.०० | १०२७५२९४ | ९७२४७०६ |
| ३१ | मा.उपमहापौर शहर विकास निधी | १२.५० | १२५०००० | -- |
| ३२ | मा.सभापती , स्थायी समिती शहर विकास निधी | १२.५० | १२५०००० | -- |
| ३३ | मा.सभापती ,महिला व बाल कल्याण | १२.५० | १२५०००० | -- |
| | | २३८९.५० | ३६,८९,३६,७४७/- | ५,००,१३,२५३/- |

१] माहे मार्च २०१३ अखेर होणार संभाव्य खर्च- १८,८९,३६,७४७/-

२] माहे मार्च २०१३ नंतर होणारा संभाव्य खर्च- ५,००,१३,२५३/-

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** बजेट मध्ये ज्या तरतूदी आहेत त्यामध्ये नवीन हेड तयार करून खर्च करण्याची तरतूद होती. याबाबत मा.शासनाकडे मत मागीतले होते. नोव्हेंबर अखेरपर्यत मा. शासनाकडून काहीही मत आलेले नाही जेव्हा मा. शासनाचे मत येईल. त्याप्रमाणे आपण खर्च करू ५० % रिलीज केलेला आहे. मा. महासभेचा ठराव, शासनाचे मत याप्रमाणे खर्च करू.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** मार्च अखेर किती व नंतर किती खर्च होतील.

**शहर अभियंता श्री. मगर :-** या वर्षीची बीले देता येतील.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** त्याच्या मागील वर्षा चे थकीतचे काय.

**मुख्य लेखाधिकारी श्री. शेलार :-** २१ कोटींची तरतूद आहे.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** तरतूद ठेवली आहे. त्यामध्ये सगळे संपतील.

**मा.सभापती साहेब :-** एकूण थकीत आज पर्यंत किती आहेत

**मुख्य लेखाधिकारी श्री. शेलार :-** अकाउंट विभागाकडे ११ कोटींची थकीत बिले आली आहेत. या वर्षी ठेकेदारांना ८ कोटी दिले.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** जेवढे जुने देणे आहे त्या सगळयांची तरतूद करा.

**मा.श्री.शेलार, मुख्यलेखाधिकारी :-** मुळ तरतूद २३८९५००/-, संभाव्य खर्च २०१२-२०१३ मार्च पर्यत १८,८९,३६,७४७/- , माहे मार्च २०१३ नंतर होणारा संभाव्य खर्च रू.५००१३२५३/- , ५ कोटीचे कामे आता केले ते कशात खतवणार.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** १२ पुर्वीच जे काम होउन गेलेल आहे. ४ कोटीची सुधारित मध्ये तरतूद केली आहे. ते ३१ मार्च पूर्वी अकौंटमध्ये येउन पडतील २२ कोटीची तरतुद आहे. इतर डिपार्टमेंट ३ कोटी जवळपास ३५ कोटी रूपयाची बिल अकौंट विभागाला येतील. एप्रिल पर्यत २० कोटीची तरतूद ठेवावी लागेल. मार्च अखेर १५ कोटीची बिले दाखल होतील.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-**सर्व २५ कोटीची तरतूद करा.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-**सर्व विभाग निहाय आकडा कॅफोनी महासभेत द्यावा. २०१२-१३ चे बजेट ८-१० दिवसांत संपेल असे पहा.

**शहर अभियंता श्री. मगर :-** मी लगेचच व्यवस्था करतो.

**मा.सभापती साहेब :-** जमा बाजू वाचा

**जमा बाजू---**

**<u>प्रस्ताव क्रमांक - १</u> वसुली विभाग- मालमत्ता नाव नोंदणी फी आकारणी बाबत.**

**मा.सौ. लोंढे मो.सं. :-** प्रस्ताव क्रमांक -१ वसुली विभाग

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** मागच्या वर्षी किती जमा झाले.

**मा.उपायुक्त (सा.)डॉ. डोईफोडे :-** रू. १ कोटी ०६ इतके झाले.

**मा.सभापती साहेब :-** किती दराने आकारणी करायची

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** तुम्ही फी आकारणी कशा पध्दतीने करता.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** खरेदीच्या किंमतीवर घेतो.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** १% वाढीव दराने आकारणी करावी. उत्पन्नात वाढ होणार असल्याने तरतूद ५० लाखांनी वाढवावी एकूण २कोटी करणेत यावी.

**मा.सभापती साहेब :-** मालमत्ता नांव नोंदणी फी मध्ये आणखी १/२ % अर्धा टक्का (एकुण १%) वाढ करणेस शिफारस आहे. तसेच एकूण तरतूद २ कोटी करणेस शिफारस आहे.

**प्रस्ताव क्रमांक-२, वसुली विभाग विषय- महाराष्ट्र (नागरीक्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ मधील कलम १८(१) नुसार वृक्ष उपकराची आकारणी बाबत.**

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** १ टक्कयानी किती फायदा होईल किती वसुल होईल

**मा.सभापती साहेब :-** सदरचा कर वाढवू नये. पुर्वी प्रमाणे वसुल करावा याबाबत शिफारस आहे.

**प्रस्ताव क्रमांक-३, वसुली विषय- जललाभ कर व मललाभ कर आकारणी बाबत.**

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** आपल्या संकलीत करावर २७% आहे. आपण ज्या गोष्टीवर करपात्र मुल्यावर १ टक्के लागल्याला पाहिजे होता तर तो संकलीत करावर लागला गेला होता, आपण जो टॅक्स लावला तो चुकीच्या पध्दतीन लागल्यामुळे तो फक्त दुरूस्त करावयाचा आहे.

**मा.सभापती साहेब :-** किती फरक पडेल.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** सुमारे ७५ लाख.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** आम्ही इथं वाढवतो. महासभा कमी करेल. डॉ. डोईफोडे तुम्ही इथ जस समजावून सांगता तस महासभेला सांगा.

**मा.सभापती साहेब :-** वाढ करायची नाही. महासभा निर्णय घेईल.

**प्रस्ताव क्रमांक-४ जकात विभाग- विषय- पारगमन पास फी रू.६०/- सहा चाकापर्यंत व रू.१००/- सहा चाकापेक्षा जास्त चाकी वाहनाकरीता असलेली पारगमन फी ऐवजी सर्व वाहनावर एकच दर म्हणजे रू.१००/- प्रमाणे पारगमन फी मध्ये सुधारणा करणेबाबत.**

**मा.सभापती साहेब :-**आपण जे ६० ची १०० केली ती कशाप्रकारे का केली ? याबाबत सर्व्हे केला का.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** महानगरपालिकेच्या कर्मचा-या मार्फत १६ दिवसांचा सर्व्हे केला त्यानुसार वार्षिक अंदाजे रुपये ३,८९,२८,३४५/- एवढी वाढीव रक्कम प्राप्त होवू शकते.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** ठेकेदार मान्य करेल का. ठेकेदाराने नकार दिला तर काय करायचे .कधी लागू करणार.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** करारनाम्या मध्ये अट आहे. मान्यते नंतर लगेच लागू करणार.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** करारनामा वाचा.

**मा.सभापती साहेब :-** जनतेच्या करात वाढ करण्यापेक्षा या मध्ये वाढ करावी. बाकीच्या महापालिकेचे अभ्यास करता इतर महापालिकेपेक्षा आपल्याकडील दर कमी आहे. याचा विचार करता निश्चित महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल इतर कर वाढविण्याची गरज पडणार नाही.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** रू.१५०/- व रू.२००/- असे दर करा.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** जळगावला सरसकट१५० आहे. धुळयाला सरसकट १५० आहे.

**मा.श्री. सातपुते दि.ना. :-** प्रशासनाने दिलेल्या रिपोर्टनुसार दर आकारण्यांत यावेत तसेच ६ चाकांच्या पुढे १५०/- प्रती वाहनासाठी दर निश्चित करण्यांत यावा.

**मा.सभापती साहेब :-** ऑफिस रिपोर्ट नुसार व झालेल्या चर्चेनुसार ६ चाकांच्या वाहनाकरीता १००/- रुपये शुल्क आकारावे तसेच ६ चाकांच्या पुढे १५०/- प्रती वाहनासाठी शुल्क आकारणी करण्यांस शिफारस आहे.

**प्रस्ताव क्रमांक-५ अग्निशमन विभाग- विषय-अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अग्निशमन कर लागू करणेबाबत.**

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** घनकचरा कर रू.१२००/- आकारला जातो. तो कसा मी फक्त शंका विचारतो.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** पुढे चर्चा करू.

**अग्निशमन प्रमुख श्री.मिसाळ :-** अग्निशमन सेवा पुरवतो. त्यासाठी आपण चार्ज आकारत नाही. अग्निशमन संचालनालय यांनी जे परिपत्रक पाठवले त्यानुसार कर योग्य मुल्याच्या २% कर लागू करावा. सर्व ड वर्ग मनपा मध्ये लागू केला आहे. हा कर लागू केल्यास आस्थापना खर्च, (संबंधित कर्मचारी) तसेच देखभाल दुरुस्ती खर्च भागविता येवून नविन वाहने खरेदी करण्यांस मदत होईल.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** हा कर कशावर लागू करणार.

**अग्निशमन प्रमुख श्री.मिसाळ :-** कर योग्य मुल्यावर.

**मा.श्री.उमेश कवडे :-** कर वाढ करु नये.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** कर वाढ करु नये.

**मा.सभापती साहेब :-** कर लागू करू नये. मात्र मा.शासनाकडे अग्निशमन सक्षमीकरणासाठी विशेष निधीची मागणी करावी.

**मा.श्री. सातपुते दि.ना.-** कै.बा.दे.दवाखाना येथे गरोदर माता यांचे साठी मा.शासनाचा जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत गरोदर महिलांसाठी करण्यात येणारे सर्व उपचार मोफत स्वरूपात करावेत तसेच नवजात शिशु यांना जन्मापासून ३० दिवसांपर्यंत मोफत उपचार करावेत. तसेच बाळंतपणासाठी रुग्णाच्या घरापासुन दवाखान्यापर्यंत मोफत वाहन व्यवस्था तसेच दाखल केल्यानंतर सदर महिलेस डिसचार्ज देईपावेतो भोजन आदी व्यवस्था या सुविधेचा अंतर्भाव जननी व शिशु सुरक्षा कार्यक्रमात असुन या बाबत प्रस्ताव सदर अंदाजपत्रकात दिसत नाही.

**मा.श्री डॉ.राजुरकर :-** जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमा अंतर्गत महिला व बालकल्याण कार्यक्रमाच्या लेखाशिर्षामधुन सदरचा कार्यक्रम राबविण्याबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेंत आला. परंतु अंदाजपत्रक सभेचा स्थायी समितीचा अजेंडा निघालेला होता. त्यानंतर मा.सभापती महोदय यांना समक्ष भेटुन सदर विषय दिनांक ०८/०२/२०१३ रोजीच्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये घेण्यांत यावा. कारण अंदाजपत्रकाच्या प्रस्तावामध्ये महिला व बालकल्याण कार्यक्रमामध्ये जननी व शिशु सुरक्षा कार्यक्रमाचा अंतर्भाव करण्यांत आलेला

आहे. परंतु या योजनेचा लाभ देतांना महानगरपालिका देत असलेल्या सेवा विनामुल्य करावयाच्या असल्याने सध्या लागू असलेले सेवा दर रद्द करावे लागणार आहेत. त्याचा सविस्तर उहापोह प्रस्तावामध्ये आहे. अशी चर्चा करण्यांत आली.

**प्र.नगरसचिव :-** जननी व शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविणे बाबत प्रस्ताव उशिराने प्राप्त झाल्याने परंतु सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर आणणे देखिल गरजेचे होते. यास्तव मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे सदरचा प्रस्ताव दिनांक ०८/०२/२०१३ रोजीचे मा.स्थायी समितीपुढे घेण्याबाबत अनुमती मागण्यांत आली. त्यानुसार मा.सभापती महोदयांनी सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती कामकाजामध्ये दाखल करण्याबाबत अनुमती दिली आहे. त्यानुसार प्रस्ताव क्रमांक ६ दाखल करुन घेण्यांत आला आहे.

**प्रस्ताव क्रमांक - ६.-** सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीमध्ये वाचन करण्यांत आला.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** जननी व शिशु सुरक्षा कार्यक्रमा अंतर्गंत गरोदर माता व शिशु यांना मा.शासनाने दिलेल्या सूचनेनुसार मोफत सेवा-सुविधा देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी. सदरचा खर्च महिला व बालकल्याण कार्यक्रमातुन राबविण्यांत यावा.

**मा.सभापती साहेब :-** जननी व शिशु सुरक्षा कार्यक्रमा अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्यांस शिफारस आहे. मात्र १ एप्रिल २०१३ पासुन या कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रशासनाने करावी.

## <u>जमा बाजू...</u>

**सर्वसाधारण कर**

**मा.सभापती साहेब :-** या वेळी २६ कोटी का.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** वसुली चालू आहे.मागणी तेवढी आहे.

**मा.सभापती साहेब :-** जाहीरात कराचे काय.त्यावर वाढ करा.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** २.५० प्रती चौ.मी. ला. आकारणी करतो. जाहिरात कर तरतूद साडेतीन लाखाची आहे.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** बोर्ड लावतात ते काम ठेकेदाराला दया त्यासाठी रेट ठरवा.

**मा.श्री.सातपुते दि.ना:-** यामध्ये वाढ करा.

**मा.श्री. जगताप नि.वि. :-** श्री. साबळे चे पुणे, औरंगाबाद , नाशिक इथे काय रेटने आकारणी करता त्याची चौकशी करा.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** २.५० प्रती चौ.मी. ने घेतो.

मा**.सौ. खरमाळे सं.र. :-** किती वसूली झाली.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** ४१०००/-

**मा.श्री. मा.सातपुते दि.ना.:-** यामध्ये वाढ करा.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** प्रायव्हेट जरी दिल तरी सध्याचा रेट ठेवावा लागेल. कारण सुरवातीला तेच योग्य राहिल.तरतूद कीती आहे.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** ३.५० लाख.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** हा विषय थांबवून इतर पालिकेचे रेट मागवा नंतर आपण पाहू

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** जे बोर्ड लागतात त्याची परवानगी घेतात का ? अतिक्रमण वाले काय करतात.

**मा.सभापती साहेब :-** श्री.साबळे इतर महापालिकेतून माहिती घ्या.व त्यानुसार कार्यवाही करा. बजेट मध्ये सुचविल्यानुसार शिफारस आहे.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** घनकचरा वाणिज्य रू.१२००/- सगळयांना आहे. कोहिनूरच एवढ मोठ दुकान त्याला रू.१२००/- टपरीवाल्याला पण रू.१२००/- .

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** करपात्र मुल्यावर लावल तर ते फायदयाच होईल.

**मा.सभापती साहेब :-** उत्पन्नात वाढ होईल. का कमी होईल.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** वाढच होईल. प्रस्ताव सादर करावा लागेल.

**मा.सभापती साहेब :-** प्रस्ताव सादर करा. किती दिवस लागतील ते सांगा.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** पुढच्या वर्षीच्या बजेटमध्ये करता येईल.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** मी यादी दिलेली होती ६ महिने झाले त्यांनी नियोजन का नाही केली.

**श्री. झिने :-** यादी दिल्याप्रमाणे मा.उपायुक्त (कर) यांचेकडे प्रस्ताव सादर केला होता परंतु त्यांनी त्याला मान्यता दिली नाही.

**मा.सभापती साहेब :-** उपायुक्तांचा शेरा काय आहे.

**श्री. झिने :-** ' सद्य स्थितीत विचार करू नये' असा आहे.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** नागरिक आमच्याकडे येतात. त्यांच्यानुसार आम्ही यादी पाठवतो.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** बोला आता काय करता येईल.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** प्रशासनाने नकारात्मक आहे असे समजून शेरा दिला त्यामुळे तो येथे आला नाही.

**मा.सौ.खरमाळे सं.र.:-**डॉ.डोईफोडे साहेब तुम्ही सांगा झिने,साबळे यांनी मला सांगायला हव होत की मा.उपायुक्त(कर)नाही म्हणतात.मग मी आयुक्तांशी बोलले असते.तुम्ही कोहिनूरला रू.५०००/-लावा.परंतु जे लोक टपरी भाडयाने घेतात त्यांच नुकसान होत डॉ.डोईफोडे मी यादी दिली होती.त्यांच्या चुका झाल्या त्याची शिक्षा गरीब नागरिकांनी का भोगायच तुम्ही नगरसेवकांना का कळवत नाही.तुम्ही याचात तरतूद करा.सर्वसामान्य नागरिक भरडले जातात.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** हे कळवायला पाहीजे होते.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** आता जर कमिटीच्या प्रस्तावानुसार बजेटमध्ये समाविष्ट करायचा असेल तर दोन दिवसामध्ये जर प्रस्ताव केला पाहीजे.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** स्थानिक संस्था कराची गांधी माहिती द्या.

**एल.बी.टी. विभाग श्री. गांधी :-** पुढील वर्षी ४८ कोटी दाखवले आहेत. गेल्या ५महिन्यात १० कोटी दाखवले आहेत.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** यात वाढ होईल.

**मा.सभापती साहेब :-** स्थानिक संस्था कर विभागामध्ये किती कर्मचारी काम करतात कोणावर कारवाई केली.

**एल.बी.टी. विभाग श्री. गांधी :-** लेखा आधारीत हा टॅक्स आहे. ६८०० रजिस्ट्रेशन आहे अजून सर्व्हे चालू आहे.व्हॅट मध्ये ४००० व सर्वे मध्ये २७०० व्यापा-यांच्या नोंदी आहेत.यात वाढ होईल.

**मा.सभापती साहेब :-** सहामाही मध्ये किती लोकांनी भरले.

**एल.बी.टी. विभाग श्री. गांधी :-** दर महिन्याला भरणे गरजेचे आहे. लेखा आधारीत असल्याने भरणे बंधनकारक आहे.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-**प्रत्येक नाक्यावर एक कर्मचारी बसवा म्हणजे कागदपत्र,बिलाची झेरॉक्स घेईल.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** या मुळे व्यापा-यांनाही समजेल व तक्रारी कमी होतील.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** स्थानिक संस्था कराबाबत. व्हॅटचे रजिष्टर्ड लोक आहे. ते ४००० आहेत. आपल्या सर्व्हेनुसार २८०० लोकांची वाढ झाली आहे. दसरा, दिवाळी आणि एक महिना आपण ३ कोटीच्या आसपास आहोत. कागदोपत्री दाखावले तर खर्चाचे बजेट वाढले प्रतिमाह ४ कोटी प्रमाणे ४८०००००/- रक्कम धरली आहे. एका वर्षात पारगमन व एल.बी.टी. धरून ७२ कोटी धरली आहे. नाक्यावरती काही प्रमाणात पुर्वी बिलाच्या झेरॉक्स घेतलेल्या आहेत.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** जकात सुरु असतांना एखादा व्यावसायिक किती माल मागवतो ते सांगा. ७००० एल.बी.टी.धारक धरले तर एका व्यापा-याने वर्षाचे किती भरले पाहिजे सरासरी किती पैसे होतात.

**एल.बी.टी. विभाग श्री. गांधी :-** जकात ठेकेदाराकडे असल्यामुळे असे सांगू शकत नाही व्यापा-यांच्या व्यावसायावर अवलंबून असते.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** वार्षिक विवरणपत्र आल्यानंतर व्यापा-याला काहीच संधी मिळू शकत नाही. सेल्सटॅक्सच्या लोकांनी आपल्याला विचारल की नोंदणी पेक्षा किती व्यापारी जास्त मिळोल २८०० लोक आपल्याकडे जास्त आहेत. रू.२ कोटी ४० लाख मुद्रांक शुल्क मा. शासनाकडे जमा झाले.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-**जास्तीत जास्त जकात कोण भरत होता.

**मा.सभापती साहेब :-** ठेकेदाराकडून माहिती मिळेल.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** व्यापा-यानें सरासरी कीती रक्कम भरली पहिजे.

**एल.बी.टी. विभाग श्री. गांधी :-** अशी माहिती नाही.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** वार्षीक विवरण पत्र भरल्यावर आशी माहिती काढा.

**मा.श्री.सातपुते दि.ना.:-** मुद्रांक शुल्क कीती आला

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** २ कोटींची मागणी मा.शासना कडे प्रलंबीत आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** कोंडवाडा विभागाकडे किती लोक आहेत.

**वृक्षअधिकारी श्री. म्हसे :-** ७ लोक आहेत.

**मा.सभापती साहेब :-** जनावर किती धरले.

**वृक्षअधिकारी श्री. म्हसे :-** कोंडवाडा बंद आहे.जनावर धरले नाही. मोकाट कुत्रे धरण्याच काम करतात.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** किती कुत्रे धरले.

**वृक्षअधिकारी श्री. म्हसे :-** केडगावच्या ३ तक्रारी होत्या. याचा रजिस्टर ठेवले आहे

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** मी तक्रार दिली होती त्याच काय झाले.

**मा.सभापती साहेब :-**रजिस्टर मागवा,कोंडवाडा खाजगी तत्वावर दया ते७लोक दुसरीकडे कामाला घ्या.

**मा.सभापती साहेब :-** गाळे हस्तांतरण फी १ लाख ठेवली आहे.लोक भरण्यास तयार आहेत आपण काहीच करीत नाही.

**मार्केट प्रमुख श्री. दिवाण :-** ७२ लोकांची हेरींग झाली आहे. ३ कर्मचारी माझ्याकडे आहेत मला लोक हवे आहेत.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** हस्तांतरण का केला नाही. ? ठराव झाल्यानंतर तो अंमलात आणला पाहिजे का ?

**मार्केट प्रमुख श्री. दिवाण :-** नोटीसा पाठवावयाच्या आहेत.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** किती जणांना नोटीसा दिल्या.

**मार्केट प्रमुख श्री. दिवाण :-** ७२ लोकांना नोटीसा द्यायच्या आहेत.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** ५०० लोकांपैकी ७२ लोकांचेच हेरींग झाले. जुन्या पालीका सभागृहात एकत्रीत सुनावणी घ्या.

**मा.श्री.डागवाले कि.आ.:-**५५० लोकांचे अर्ज आहेत का? यामध्ये उत्पन्न ७२ लाख का नाही दाखवले.

**मा.सभापती साहेब :-** २ वर्षापासून साडेपाच कोटी रूपये आले असते.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** २०० गाळे ट्रान्सफर करून रू. २ कोटी रूपये एका वर्षात जमा करावेत. बजेटमध्ये २ कोटी रूपये धरून कमीत कमी २ कोटी रूपये एक वर्षात दया. आवश्यक ते कर्मचारी देतो.

**मा.सभापती साहेब :-** आठ, दहा दिवसात २५ लाख रूपये वसुल पाहिजे. या हस्तांतरण फीची रक्कम मुख्यलेखाधिकारी यांनी स्वतंत्र खाते बँकेमध्ये उघडावे व त्याचा उपयोग सावेडी परिसरात व्यापारी संकुल बांधणे कामी करावा. दरवर्षी किती भाडे वाढ होती.

**मार्केट प्रमुख श्री. दिवाण :-** दरवर्षी ३% भाडेवाढ करतो.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** साहेब मंगल कार्यालय भाडेवाढ करायला पाहिजे. जेथे पैसे मिळतात तेथे स्टाफ द्या. गाळे भाडेवाढ कशी करतो.

**मार्केट प्रमुख श्री. दिवाण :-** दरवर्षी ३ टक्के.

**मा.सभापती साहेब :-** गाळा हस्तांतरण फी लेखाशिर्षामध्ये एकुण तरतुद २ कोटी रुपये करणेस शिफारस आहे.

**मा.सभापती साहेब :-** महालक्ष्मी उदयान चालवायला दया तिथले १० कर्मचारी दुसरीकडे टाकता येतील. तसेच महालक्ष्मी उदयान ठेकेदाराला दया म्हणजे निगा राहील आणि कर्मचारी दुसरीकडे वापरता येतील.फुलराणी व मत्स्यालयाचे उत्पन्न कोठून येते.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** फुलराणी व मत्सालय सुरु आहे का.

**उदयान प्रमुख श्री. गोयल :-** फुलराणी चालू आहे. एप्रिलपर्यत उत्पन्न वाढेल डिसेंबर पर्यतचे आकडे आहेत.

**मा.श्री. कवडे उ. खं. :-** मंगल कार्यालयाची कार्यालय निहाय उत्पन्नाची माहिती दया.

**शहर अभियंता श्री. मगर :-** ही माहिती माहिती व सुविधा केंद्र देईल.

**मा.सभापती साहेब :-** बेलदार गल्ली , सर्जेपुरा येथील महानगरपालिकेच्या मोकळया जागेमध्ये मंगल कार्यालयासाठी रू.५ लाखाची प्राथमिक तरतूद करण्यांत यावी. सदरचा खर्च नवीन इमारती या लेखाशिर्षामधून करणेस शिफारस आहे.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** जलविहारचा रू.२ लाखाच उत्पन्न आहे.

**श्री. काकडे :-** महिन्याला १७ हजार ६०० रूपये याप्रमाणे करार दि.३/६/२०१० ला केलेला आहे. करार ५ वर्षाचा आहे.

**मा.सभापती साहेब :** दरवर्षी फी दर वाढ करावी.

**श्री. काकडे :-** करारनामा ५ वर्षाकरीता आहे. त्यानंतर फी वाढी बाबत निर्णय घेता येईल.

**मा.सभापती साहेब, मा.श्री. डागवाले कि.आ.:-** करारात रक्कम वाढविण्याची तरतूद आहे का.

**श्री. काकडे :-** नाही.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** अनाधिकृत बांधकामा वर कारवाई केली तरउत्पन्न वाढेल.कारवाई होते का.

**नगररचनाकार श्री. दहे :-** नियम २ प्रकारचे आहे. कंप्लीशन देते वेळेस १० ते २० % तो जास्त बांधू शकतो.

**मा.सौ.खरमाळे सं.र. :-** ३ रूम असतील त्याच्यावर दोन रूम बांधले तर त्याला आकारणी लागत नाही खरा सर्व्हे झाला तर उत्पन्नात नक्कीच वाढ होईल.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** परमिशन न घेता बांधणे तर त्याच्या उत्पन्न बुडत.

**नगररचनाकार श्री. दहे :-** विनापरवाना करीता वॉर्ड ऑफीसर ने रिपोर्ट द्यायचा आहे.त्यांना अधिकारी आहेत.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** विनापरवाना बांधले त्यांचे काय.

**नगररचनाकार श्री. दहे :-** त्या करीता अतिक्रमण विभाग कारवाई करतो.

**मा.श्री.सातपुते दि.ना. :-** बांधकाम नकाशा शिवाय बांधकाम केले जाते त्यावर कारवाई होत नाही.

**प्रभाग अधिकारी क्र.१ श्री. तडवी :-** माझ्याकडे नकाशे येत नाहीत. आम्हाला इंजिनिअरच साथ मिळत नाही. माझ्याकडे नोटीस काढलेली आहे. नकाशा व बांधकाम परवानगी माझ्याकडे नाही. तर मी काय करू शकतो. अनाधिकृत बिल्डींग आहे त्याला नगररचनाकार उत्तर देउ शकतील मी देउ शकत नाही बांधकाम परवानगी नगररचनाकार देतात.आमच्याकडे तांत्रीक स्टाफ नाही.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** नगररचना कडे नकाशा मागीतला का.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** डॉ. डोईफोडे साहेब कुणावर वचक नाही.

**अतिक्रमण प्रमुख श्री. इथापे :-** प्रभाग अधिका-यांना अधिकार दिलेले आहेत ते जाउन पाहू शकतात.नकाशे मागू शकतात.जर दिले नाही तर अनधिकृत समजून कारवाई करता येते.

**नगररचनाकार श्री. दहे :-** आयुक्त लेव्हलवर सुचना दिलेल्या आहेत. त्यांना डायरेक्ट कारवाई करण्याचा अधिकार आहे. बांधकाम परवानगीच्या ५ प्रती काढून ते पाठवतो.

**मा.श्री.भोसले ग.पुं.:-**प्रभागअधिकारी यांनी जाउन जागेवर मालमत्ता धारकाला बांधकाम परवानगी मागू शकता व बांधकाम बंद करण्याचा अधिकार आहे झोन प्रमुखांना एकदा बसवून सर्व शिकवा.

**नगररचनाकार श्री.दहे :-**मी हजर झाल्यानंतर सर्वांना समक्ष प्रशिक्षण दिलेले आहे.सगळे सांगितल आहे.

**प्रभाग अधिकारी क्र.१ श्री. तडवी :-** मी सगळयांना फोन लावतो लोक आम्हाला साथ देत नाही बाकी सगळे गप्पा रहातात.प्रभाग अधिकारी अडचणीत येतो.

**मा.सभापती साहेब :-** गुंठेवारीची प्रकरण लवकर मार्गी लावा.

**नगररचनाकार श्री. दहे :-** कलेक्टर साहेबांनी बंद कलेले होते. जानेवारी २००१च्या नंतरची गुंठेवारी करता येत नाही. ३१ डिसेंबर २००० च्या आतील गुंठेवारी करता येते.

**मा.सभापती साहेब :-** मालमत्ता नोंदणी फी किती व ज्याचा रेट किती.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** मालमत्ता नोंदणी फी १ % करण्यात आली.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** ज्या मालमत्तेवर जाहिरात बोर्ड लावते त्यांनी परवानगी घेतल्या का?

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** परवानगी घेतली आहे. एकूण ७१स्पॉटस आहेत. जाहिरात कर घेतो. खासगी जागेवर जाहिराती लावतात ते परवानगी घेतात.

**मा.सभापती साहेब :-** जे शहरात मोठे होर्डीग्स कायमस्वरूपी आहे त्याच उत्पन्न किती ?

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** साडेतीन लाख रूपये.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** स्पॉट वाढवा

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** गाडगीळ पटांगणात भाजी मार्केट, भरत तिथ जाहिरात बोर्ड साठी जागेसाठी सर्व्हे करा. म्हणजे उत्पन्न वाढेल.

**जकात अधिक्षक श्री. साबळे :-** हो करतो.

**मा.श्री. शेख अरिफ शे.र. :-** मनपा शाळा कुणाकुणाला दिल्या यादी आहे का ?

**मनपा शाळा श्री. शिदोरे :-** मार्केट विभागाला माहिती आहे.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** शाळांना भाडेवाढ कशी देतो.

**मार्केर्ट प्रमुख श्री.दिवाण :-** ३ टक्के.

**मा.सभापती साहेब :-** सेप्टीक टँक उत्पन्न किती / खाजगीकरणाबाबत विचार करावा.

**उपआरोग्य अधिकारी डॉ. पैठणकर :-** रू. ३ लाख , प्रस्ताव ठेवला आहे.

**मा.श्री. सातपुते दि.ना. :-** गाडळकर केडगाव पाणी पुरवठा योजनोला खर्च किती.

**खर्च बाजू---**

**मा.सभापती साहेब :-** मागच्या वर्षी गणवेश खरेदीवर बराच खर्च झाला.

**मा.सौ.खरमाळे सं.र. :-** गणवेश कुणीही वापरत नाही.

**स्टोअर प्रमुख श्री.जाधव :-** पुरूष कर्मचा-यांना दोन वर्षातून एकदा व स्त्रीयांना एक वर्षातून एकदा देतो.

**मा.सभापती साहेब :-** संगणकाला २४ लाख खर्च कशाला.

**संगणक प्रमुख श्री. साळी :-** रूपये १७ लाख लागतात. एल.बी.टी. साठी खर्च लागतो. के.डी.एम.सी. संगणक प्रणाली साठी रू.१० लाख खर्च अपेक्षीत आहे.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** एल.बी.टी.चे झाले ना.

**संगणक प्रमुख श्री. साळी :-** सॉफट वेअर करीता ठेवली आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** १५लाख ठेवा.

**मा.श्री.सातपुते दि.ना. :-** मागील वर्षी किती खर्च झाला .

**संगणक प्रमुख श्री. साळी :-** १७ लाख.

**मा.सभापती साहेब :-** विद्यार्थांना बक्षिस २५००० का ?

**मा.श्री. सातपुते दि.ना. :-** बक्षिस किती देतो आपण

**सहा.आयुक्त श्री. परशरामी :-** एक हजारच्या आसपास

**मा.सभापती साहेब :-** रू.७५ हजाराची तरतूद करा. १२ वी व १० वी मध्ये ८० टक्के पेक्षा जास्त मार्क मिळविणा-या कर्मचा-यांच्या पाल्यांना पारितोषिक देण्यांत यावे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** पोलीस बंदोबस्ताकरीता किती खर्च झाला.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** काहीच नाही.

**मा.श्री. कवडे उ.खं. :-** मोकाट कुत्र्यांवर खर्च कसा होतो.

**प्र.आरोग्य अधिकारी डॉ.राजूरकर :-** निर्बीजीकरणासाठी खर्च अपेक्षीत आहे. कुत्रा चावल्यानंतर लस मोफत देण्याची सोय आहे.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** दुर्धर आजार मदतीसाठीची तरतूद वाढ करा.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** नवीन एल.इ.डी.दिव्यांची किती गॅरटी आहे.

**इले. प्रमुख प्रतिनिधी :-** साहित्य खरेदी रू.२३ लाख ७० हजार होता आता ४० लाखाची तरतूद आहे.

**मा.सभापती साहेब :-** पेट्रोल ८१०००० लाख खर्च फार होतो.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** मो.व्हे.चे कोण आहे.

**उपआरोग्य अधिकारी डॉ. पैठणकर :-** ८ गाडया आहेत झोनसाठी

**मा.सभापती साहेब :-** डिझेल भरायला शहरात जातात. त्या ऐवजी उपनगरात डिझेल भरल्यास इकडे तिकडे जाण्याचा वेळ वाचतो.

**उपआरोग्य अधिकारी डॉ. पैठणकर :-** सर स्टोअर करायला जागा नाही.

**मा.सभापती साहेब :-** ८१००००० हा खर्च कमी करा. सावेडी भागाकरीता स्वतंत्र इंधन भरणेची सुविधा निर्माण करा.

**मा.श्री. कवडे उ.खं. :-** बेवारस प्रेतांची विल्हेवाट ठेकेदार लावतो ते चुकीचे आहे. २ फुट खड्डा खांदतो. त्यामुळे कुत्रे सदरची जागा उकरतात त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते.

**प्र. आरोग्य अधिकारी डॉ. राजूरकर :-** त्याला ४ फुट खड्डा खांदायला सांगतो.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** फिरते शौचालय आवश्यक आहे.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** १० सिटच फिरते शौचालय खरेदी करण्याला खर्च किती

**स्टोअर प्रमुख श्री. जाधव :-** ४ लाख ४५ हजार सोडसहाशे १ ट्राली फक्त.

**मा.सभापती साहेब :-** ३ शौचालय युनीट व १ट्रॅक्टर खरेदी करा.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** शववाहिनी नविन मोठी खरेदी करा. ॲम्ब्युलन्स चालू आहे का ?

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** उंदरांचा पिंजरा एकही दिसत नाही.

**उपआरोग्य अधिकारी डॉ. पैठणकर :-** १० पिंजरे आहेत दोन कर्मचारी आहेत.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** वैरणीचा खर्च किती झाला.

**उदयान प्रमख श्री. गोयल :-** स्टोअरकडून चारा मागवला होता.

**स्टोअर प्रमुख श्री. जाधव :-** चारा खरेदी झाली नाही.

**मा.सभापती साहेब :-** ट्री गार्ड कोणाला दिले. १५लाखाचा खर्च काय झाला.

**उदयान प्रमुख श्री. गोयल :-** वसुंधरा महोत्सव कार्यक्रम झाला. सिध्दीबाग , महालक्ष्मी उदयान येथील खेळणी दुरूस्त केल्या अडीच ते तीन लाखाचा खर्च झाला.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** मनपाचा जे.सी.बी. काय झाला. कुठे आहे. जे.सी.बी. आहे का ?

**शहर अभियंता श्री. मगर :-** बंद अवस्थेत आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** जुनी वाहने विक्री करा. त्याबाबत लिलाव बोलवा.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** मनपा सभागृह नवे असताना दुरूस्ती तरतुद कशाला.

**शहर अभियंता श्री. मगर :-** ती जुन्या सभागृहाकरीता आहे.

**मा.श्री. कवडे उ.खं. :-** वॉर्ड विकास निधी कीती आहे

**मा.श्री. डागवाले कि.आ.:-** मागचा किती होता.

**मा.सौ. लोंढे मो.सं. -** २ कोटी.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** हा निधी वाढवा.

**मा.सभापती साहेब :-** वॉर्ड विकास निधी वाढवा मागचा रू.३ कोटी १८ लाख करा.

**मा.उपायुक्त(सा.)डॉ.डोईफोडे :-** श्री. मगर नवीन स्मशान भुमीचे काय.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** श्री. दहे यांना जागा कुठे आहे.

**शहर अभियंता श्री. मगर :-** पंपीग स्टेशन जवळ जागा आहे.

**मा.सभापती साहेब :-** अमरधाम हे सावेडी उपनगरातील लोकांना लांबचे व खर्चिक असल्याने सावेडी उपनगरातील नागरिकांसाठी स्मशान भुमी होणे गरजेचे आहे. त्याकरीता नविन स्मशानभुमी सुधारणा या लेखाशिर्षकात १५ लाख रुपये तरतुद वाढविणेस शिफारस आहे.

**शहर अभियंता श्री. मगर :-** १०लाख वाढवा.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** थकीत देयके निधी रू.२० कोटी आहे.आपला एकूण आकडा किती आहे.

**मुख्य लेखाधिकारी श्री. शेलार :-** ३५ कोटी.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** सावेडी गंगा गार्डन मागे महिलांकरीता जलतरण तलाव करणे योग्य आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** सुधारणा सगळी कडे व्हाव्यात.

**मा.सभापती साहेब :-** सर्वात जास्त घरपट्टी सावेडी मधून येते.

**मा.श्री.सातपुते दि.ना. :-** सावेडी गंगा गार्डन जवळ महिलांसाठी जलतरण तलाव, जीम व जॉगींग ट्रॅक करण्यच्या दृष्टीने मा.महापौर, मा.आयुक्त, सौ.खरमाळे ताई यांनी पाहणी केली होती. सदर प्रकल्पासाठी २५ लक्ष रुपये प्राथमिक तरतुद करावी.

**मा.सभापती साहेब :-** महिलांसाठी जलतरण तलाव बांधणेसाठी तरतुद करावी.

**मा.श्री.डागवाले कि.आ. :-** महापौर शहर विकास निधी ४ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी २५ लक्ष, मा.सभापती स्थायी समिती शहर विकास निधी २५ लक्ष रुपये, मा.सभापती महिला व बालकल्याण शहर विकास निधी १५ लक्ष, व उपसभापती महिला व बालकल्याण शहर विकास निधी १० लक्ष रुपये करण्यांत यावा. रेखांकन अंतर्गत सुधारणा लेखाशिर्षामध्ये १ कोटीने वाढ करावी एकुण तरतुद रक्कम रुपये २ कोटी करावी. त्यानुसार जमा व खर्च बाजु मध्ये रक्कम दर्शविण्यांत यावी. उपनगरातील रस्ते नसलेल्या ठिकाणी रस्ते विकास करणे या लेखाशिर्षात २५ लाख रुपये तरतुद वाढविण्यांत यावी. खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे या लेखाशिर्षामध्ये २५ लक्ष रुपये तरतुद करण्यांत यावी. पारगमन शुल्क तरतुदीमध्ये रक्कम रुपये ७ कोटी तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** रेखांकन अंतर्गत सुधारणा लेखाशिर्षामध्ये १ कोटीने वाढ करावी एकुण तरतुद रक्कम रुपये २ कोटी करावी. त्यानुसार जमा व खर्च बाजु मध्ये रक्कम दर्शविण्यांत यावी. उपनगरातील रस्ते नसलेल्या ठिकाणी रस्ते विकास करणे या लेखाशिर्षात २५ लाख रुपये तरतुद वाढविण्यांत यावी. खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे या

लेखाशिर्षामध्ये २५ लक्ष रुपये तरतुद करण्यांत यावी. पारगमन शुल्क तरतुदीमध्ये रक्कम रुपये ७ कोटी तरतुद करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** मा.महापौर शहर विकास निधी ४ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी २५ लक्ष, मा.सभापती स्थायी समिती शहर विकास निधी २५ लक्ष रुपये, मा.सभापती महिला व बालकल्याण शहर विकास निधी १५ लक्ष, व उपसभापती महिला व बालकल्याण शहर विकास निधी १० लक्ष रुपये, रेखांकन अंतर्गत सुधारणा लेखाशिर्षामध्ये १ कोटीने वाढ करावी एकुण - तरतुद रक्कम रुपये २ कोटी करावी. त्यानुसार जमा व खर्च बाजु मध्ये रक्कम दर्शविण्यांत यावी. उपनगरातील रस्ते नसलेल्या ठिकाणी रस्ते विकास करणे या लेखाशिर्षात २५ लाख रुपये तरतुद वाढविण्यांत यावी. खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे या लेखाशिर्षामध्ये २५ लक्ष रुपये तरतुद करण्यांत यावी. पारगमन शुल्क तरतुदीमध्ये रक्कम रुपये ७ कोटी तरतुद करण्यांत यावी या सर्व बाबत शिफारस आहे.

**मा.सौ. खरमाळे सं.र. :-** अंदाजपत्रकीय सभेत झालेली चर्चा तसेच प्रस्तावातील दुरूस्ती व फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

**मा.श्री. कवडे उ.खं. :-** अंदाजपत्रकीय सभेत झालेली चर्चा तसेच प्रस्तावातील दुरूस्ती व फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

**मा.सभापती साहेब :-** सर्व मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी , कर्मचारी यांनी सभा पार पाडणे कामी केलेल्या सहाकार्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. आजची मा.स्थायी समिती बजेटवरील बैठक संपल्याचे जाहिर करतो.

मा.आयुक्त साहेब यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सभेमध्ये चर्चा करून निर्णय घेतलेले असुन त्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये दुरूस्त्या फेरफार व शिफारशीसह सन २०१२-२०१३ सालचे सुधारित सन २०१३-२०१४ सालचे बाबवार अंदाजपत्रक मनपाचे स्कुल बोर्डाचे शेअर्ससह महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

--**--

**<u>ठराव :-</u>** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समितीकडे सादर झालेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ सालचे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) व त्या सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले प्रस्ताव सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ सालचे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे म.न.पा. स्कुल बोर्डासहचे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करित आहे

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३ सालचे सुधारित व सन २०१३-२०१४ सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे. (**सोबत**-सन २०१२-२०१३ सालचे सुधारीत व सन २०१३-२०१४ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता)

मा.आयुक्त साहेब यांनी मनोगतामध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्र.१** :- वसुली विभाग- मालमत्ता नाव नोंदणी फी आकारणी बाबत.

**प्रस्ताव क्र.२** :- वसुली विभाग- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ मधील कलम १८ (१) नुसार वृक्ष उपकाराची आकारणीबाबत.

**प्रस्ताव क्र.३** :- वसुली विभाग- जललाभ कर व मललाभ कर आकारणीबाबत.

**प्रस्ताव क्र.४** :- जकात विभाग- पारगमन पास फी रू.६०/- सहा चाका पर्यत व रू.१००/- सहा चाकापेक्षा जास्त चाकी वाहनाकरीता असलेली पारगमन फी ऐवजी सर्व वाहनावर एकच दर म्हणजे रू.१००/- प्रमाणे पारगमन फी मध्ये सुधारणा करणेबाबत.

**प्रस्ताव क्र.५**:- अग्निशमन विभाग- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अग्निशमन कर लागू करणेबाबत.

**प्रस्ताव क्र. ६ :-** महानगरपालिका कार्यक्षेत्रात जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविणेबाबत.

**या प्रस्तावास पुढिलप्रमाणे शिफारस करण्यांत येत आहे.**

**प्रस्ताव क्र.१** :- मालमत्ता नाव नोंदणी फी आकारणी बाबत. -- या फी मध्ये १/२ टक्का वाढ करण्यांत यावी एकुण १ टक्का फी आकारण्यांत यावी.

**प्रस्ताव क्र.२** :- यामध्ये दरवाढ करण्यांत येवू नये. पुर्वीप्रमाणे आकारणी करण्यांत यावी.

**प्रस्ताव क्र.३** :- यामध्ये दरवाढ करण्यांत येवू नये. पुर्वीप्रमाणे आकारणी करण्यांत यावी.

**प्रस्ताव क्र.४** :- ऑफिस रिपोर्ट नुसार व झालेल्या चर्चेनुसार ६ चाकांच्या वाहनाकरीता १००/- रुपये शुल्क आकारावे तसेच ६ चाकांच्या पुढे १५०/- प्रती वाहनासाठी शुल्क आकारणी करण्यांस शिफारस आहे.

**प्रस्ताव क्र.५**:- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अग्निशमन कर लागू करणेत येवू नये. मात्र अग्निशमन सक्षमीकरणासाठी मा.शासनाकडे विशेष निधीची मागणी करण्यांत यावी.

**प्रस्ताव क्र. ६ :-** महानगरपालिका कार्यक्षेत्रात जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविणेबाबत ऑफिस रिपोर्टनुसार मान्यता देणेकामी शिफारस आहे. सदर कार्यक्रम महिला व बालकल्याण कार्यक्रम या लेखाशिर्षामधुन करण्यांत यावा.

**तसेच**

* महानगरपालिकेच्या कर्मचा-यांच्या पाल्यांकरीता इ.१२ वी व १० वी मध्ये ८०% पेक्षा जास्त गुण प्राप्त करतील अशा सर्व विद्यार्थांचा रोख स्वरूपात रक्कम देवून सत्कार करणेस शिफारस आहे.

* महानगरपालिकेच्या मालकीच्या बेलदार गल्ली, सर्जेपुरा येथे मोकळया जागेमध्ये मंगल कार्यालय बांधकाम करणेकामी **नवीन इमारत** या लेखाशिर्षा मधुन रक्कम रू.५ लाखाचा खर्च भागविण्यास शिफारस आहे.

**१)** कोंडवाडा व महालक्ष्मी उद्यान खाजगी करणाच्या माध्यमातुन चालविण्यांस देण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

**२)** सेप्टीक टँक सफाईचे काम खर्चाच्या दृष्टीने मनपास परवडत नसल्याने सदरची सेवा खाजगी करणाच्या माध्यमातुन सुरु करण्यासाठी ही सभा शिफारस करीत आहे. मा.महासभेमध्ये खाजगीकरणा बाबत निर्णय झाल्यास पुढील कार्यवाही मा.स्थायी समितीकडे सविस्तर प्रस्ताव पाठवून निविदा मागविण्याबाबत कार्यवाही करावी.

**३)** जाहीरात बोर्ड जागा भाडे याबाबत इतर महानगरपालिकेतुन माहिती मागवुन त्यानुसार उत्पन्न वाढीच्या दृष्टीने आवश्यक तो प्रस्ताव सत्वर सादर करण्यांत यावा.

**४)** सावेडी उपनगरामधील कचरा वहातुक वाहनांकरीता इंधन पुरवठा करणेकामी स्वतंत्र व्यवस्था करण्यांत यावी. त्यामुळे इंधन खर्चात बचत होईल.

**५)** गाळे हस्तांतरण फी मधुन मिळणारे उत्पन्न बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडुन रक्कम जमा करण्यांत यावी. व या रक्कमेतुन सावेडी भागामध्ये व्यापारी संकुल इमारत उभारणे कामी खर्च भागवावा.

**६)** गंगाउद्यान मागील जागेत महिलांकरीता जलतरण तलाव, जीम व जॉगिंग ट्रॅक बांधण्या बाबत स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करुन रक्कम रुपये २५ लक्षची तरतुद करण्यांत यावी.

अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१२-२०१३ सालचे सुधारित **व** सन २०१३-२०१४ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या स्कुल बोर्डासह शेअर्ससह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.खरमाळे संगिता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कवडे उमेश खंडेराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
(मा.श्री.वाकळे बाबासाहेब सोन्याबापू)
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर**

**मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०१२-२०१३ चा सुधारीत अर्थसंकल्प**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१२)......................................................५५४१८२३१**

**एकुण जमा.................................................................................... ३६९०९१८४०४**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा...........................................................३७४६३३६६३५**

**एकुण खर्च.................................................................................... ३६१४६७३५०४**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१३)..................................................१३१६६३१३१**

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू)** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शिक्षण कर मार्केट | ६००० | १०००००० | | १००६००० |
| | | | | | |
| | | **६०००** | **१००००००** | **०** | **१००६०००** |

**--**--**

| अ. नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू)** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शिक्षण कर मार्केट | ६००० | १०००००० | | १००६००० |
| २ | विळद वाया जाणा-या पाण्याचा पुर्नवापर करणे/पाण्याची टाकी-परिसर बळकटीकरण /पाणी पुरवठा बांधकाम विषयक कामे, नविन सुधारणा कामे | ५००००० | ४५००००० | | ५०००००० |
| | | | | | |
| | | **५०६०००** | **५५०००००** | **०** | **६००६०००** |

सही /-

श्री. बाबासाहेब वाकळे,

सभापती , स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर**

**मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०१३-२०१४ चा सुधारीत अर्थसंकल्प**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१३)......................................................१३१६६३१३१**

**एकुण जमा.............................................................................. ४०५२९३००००**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा........................................................ ४१८४५९३१३१**

**एकुण खर्च.............................................................................. ४१२४७५५०००**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१४).................................................. ५९८३८१३१**

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू)** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | पारगमन शुल्क | २४८४०००००० | ७००००००० | | ३१८४०००००० |
| २ | गाळे हस्तांतरण फी | १००००० | १९९००००० | | २०००००००० |
| ३ | रेखांकन अंतर्गत सुधारणा | १०००००००० | १०००००००० | | २०००००००० |
| ४ | अग्निशमन कर | ५०००००० | | ५०००००० | ० |
| ५ | मालमत्ता नाव नोंदणी फी | १५०००००० | ५०००००० | | २०००००००० |
| | | | | | |
| | | **२७८५०००००** | **१०४९०००००** | **५०००००००** | **३७८४०००००** |

--**--

| अ.नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू)** | मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | महापौर शहर विकास निधी | ० | ४०००००००० | | ४०००००००० |
| २ | उपमहापौर शहर विकास निधी | ० | २५०००००० | | २५०००००० |
| ३ | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ० | २५०००००० | | २५०००००० |
| ४ | सभापती- महिला व बाल श्हार विकास निधी | ० | १५०००००० | | १५०००००० |
| ५ | उपसभापती- महिला व बाल शहर विकास निधी | ० | १०००००० | | १०००००० |
| ६ | वॉर्ड विकास निधी | ० | ३१८०००००० | | ३१८०००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | गंगा उद्यान मागील जागेत महिलांकरीता जलतरण तलाव, जिम व जॉगिंग ट्रॅक करणे | ० | २५००००० | | २५००००० |
| ८ | उपनगरातील रस्ते नसलेल्या ठिकाणी रस्ते विकास | ५०००००० | २५००००० | | ७५००००० |
| ९ | रेखांकन अंतर्गत सुधारणा | १००००००० | १००००००० | | २००००००० |
| १० | खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतूक करणे, वाहन खरेदी, डिझेल इ. खर्च | ३००००००० | | २५००००० | २७५००००० |
| ११ | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी | १५००००० | १०००००० | | २५००००० |
| १२ | विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीसे | २५००० | ५०००० | | ७५००० |
| | | | | | |
| | | **४६५२५०००** | **९५३५००००** | **२५०००००** | **१३९३७५०००** |

सही /-

श्री. बाबासाहेब वाकळे,

सभापती , स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर